# उजेडाचे तोरण

यंदाच्या दिवाळीच्या
नेत्रज्योती उजळूया
उजेडाचे तोरण
दारी बांधू या...

दारात रेखाटली
सुंदरशी रांगोळी
रांगोळीत भरली
जिवंत रंगावली
सर्वांच्या स्वप्नात
नवरंग भरु या
उजेडाचे तोरण दारी बांधू या...

दिवाळीचे उटणे,
सुगंध दरवळे
अभंग माया ही
सणाला या सापडते
दिवाळीच्या सणाला
संकल्प नेत्रदानाचा
उजेडाचे तोरण दाराला
बचंधण्याचा...

फराळाची रेलचेल
दिवाळीत असे फार
सगळीकडे गोडधोड
आनंद असे छान
आनंद हा सणाचा
शाश्वत करु या
अंध बांधवांना
उजेड देऊ या
उजेडाचे तोरण दारी बांधू या...

–डॉ.सौ.सुधा कांकरिया